# मुंबई विद्यापीठ

विद्याविषयक नियोजन
आणि विकास विभाग
APD/ICD/432/561/2018-2019
२० फेब्रुवारी, २०१९

परिपत्रक:—

विषय : दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी "मराठी भाषा गौरव दिन" साजरा करणेबाबत

संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक: उशिंस/मवि–१/मराठी भाषा गौरव दिन २०१९/२२६३ दिनांक फेब्रुवारी, २०१९

उपरोक्त परिपत्रकान्वये महाराष्ट्र शासन व मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार असे सुचित करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयात व विद्यापीठ विभागामध्ये "**मराठी भाषा गौरव दिन**" साजरा करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. त्यासाठी संलग्नित महाविद्यालयांनी तसेच विद्यापीठाच्या विविध विभागामध्ये/संस्थांमध्ये आपापल्या अर्थसंकल्पात आवश्यक ती आर्थिक तरतुद करावी व या दिनासाठी आपल्या संस्थेत सदर कार्यक्रम साजरा करण्याची रूपरेषा कशी तयार केली आहे अथवा करण्यात येत आहे त्याबाबतची माहिती सादर करावी.

आपणांस असे सुचित करण्यात येत आहे की, मा. मंत्री यांचे पत्र दिनांक ८.२.२०१९ नूसार मराठी भाषा गौरव दिनी "**मराठी म्हणी**" या विषयाला प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आले आहे. दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करतांना प्रामुख्याने मराठीतील म्हणीविषयक कार्यक्रम तसेच २३ उपक्रमांच्या दिलेल्या सूचीनुसार आपल्या कार्यालयीन स्तरावर मराठी भाषा दिन साजरा करण्यात यावा. महाविद्यालयांनी तसेच कार्यालयीन स्तरावर मराठी भाषा गौरव दिन साजरा केल्याबाबतचा छायाचित्रांसह अहवाल Unicode.vinodtawde@gmail.com या इ–पत्यावर तात्काळ पाठविण्यात यावा. तसेच सदर कार्यक्रमांचे आयोजन केल्याचे स्वतंत्र अहवाल विद्यापीठास सहायक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, मुंबई – ४०० ०३२ येथे सादर करावा.

(डॉ. विनोद पाटील)
प्रभारी कुलसचिव

मुंबई– ४०० ०३२
२० फेब्रुवारी, २०१९

प्रत रवाना —

प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संचालक/विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.




-०३मराठी भाषा गौरव दिन बोधचिन्ह (लोगो).JPG

४15

मा.म.मंत्री/शा.शि.क्री.यु.क.उ.तं.म.भा.सां.का.अ.वि.व व.
टिप्पणी क्र. 6240/20 दिनांक :


**विनोद तावडे**

**मंत्री**

**शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,**
**उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,**
**अल्पसंख्याक विकास व वक्फ**

महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*


दिनांक :- 8 FEB 2019

सप्रेम नमस्कार !

**आपणा सर्वांना मराठी भाषा गौरव दिनाच्या खूप शुभेच्छा!** ज्येष्ठ कवी व ज्ञानपीठ पुरस्कार [illegible] कुसुमाग्रज वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिन दि. २७ फेब्रुवारी, हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून, शासनाच्या वतीने विविधांगी उपक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाच्या मराठी भाषा गौरव दिनी, आपण **'मराठी म्हणी'** या विषयाला प्राधान्य देण्याचे ठरविले आहे.

'मराठी म्हणी' या मध्यवर्ती कल्पनेच्या अनुषंगाने मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनाचा विचार होणे अपेक्षित आहे.

चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे धन जपू या !!

**चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे मन जपू या !!** .... असा संकल्प करून, आपण प्राधान्याने मराठीतील म्हणींविषयक कार्यक्रम-उपक्रम आयोजित करावेत.

त्याचप्रमाणे, हे वर्ष **ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष** आहे. त्यामुळे कार्यक्रम-उपक्रमांमध्ये या प्रतिभावंतांच्या साहित्याचाही यथायोग्य विचार व्हावा.

मराठी भाषा गौरव दिनी, महाराष्ट्रातील सर्व प्रशालय, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा यांचे संस्थाप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी या **सर्वांनी त्या-त्या ठिकाणच्या उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवावा. तसेच, संगणकावर युनिकोड-मराठी सुरू करून, मला unicode.vinodtawde@gmail.com या इ-पत्त्यावर टंकलिखित संदेशही पाठवावा,** असे आग्रही आवाहन मी करीत आहे. त्याचबरोबर आपण आपल्या संस्थेत यथायोग्य उपक्रमांचे आयोजन करावे. [illegible]

सर्व प्रमुखांनी आपल्या अधीनस्त असणाऱ्या सर्व संस्थांना याबाबत सूचना द्याव्यात व त्याचा अनुपालन अहवाल इ-टपालाद्वारे मला पाठवावा. प्राचीन भाषांपैकी एक असलेल्या आणि भारतातील अधिकृत भाषांपैकी एक असलेल्या आपल्या मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी आपण सकारात्मक प्रतिसाद द्याल, याची खात्री आहेच. गेली २-३ वर्षे आपला सर्वांचा सहभाग आमचा उत्साह वाढवणारा होता, याही वर्षी मराठी भाषा गौरव दिन अधिक उत्साहाने साजरा करावा, हे आग्रहाचे आवाहन।

**सहपत्र — उपक्रमांची सूची.**

आपला,

(स्वाक्षरी)

(विनोद तावडे)

## दि. २७ फेब्रुवारी, २०१९ : मराठी भाषा गौरव दिन — उपक्रम सूची

१. या वर्षीच्या मराठी भाषा गौरव दिनाची मध्यवर्ती कल्पना- **'मराठी म्हणी'** -

**चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे 'धन' जपू या !!**
**चला, मराठी 'म्हण' जपू या ! मराठीचे 'मन' जपू या !!**

...मराठीतील म्हणींच्या जतन व संवर्धनासाठी विविध उपक्रमांचे आयोजन. जसे, म्हणी स्पर्धा, भित्तिचित्रे, सोशल मीडियावर प्रचार, म्हणींची पुस्तके, म्हणीकोश, भाषणे, चर्चासत्रे, परिसंवाद, इ.

२. पु. ल. देशपांडे व ग. दि. माडगूळकर यांच्या **जन्मशताब्दी वर्षानिमित्त** शाळा व महाविद्यालयांमध्ये पु. ल. देशपांडे यांच्या पुस्तकांतील उताऱ्यांचे आणि ग. दि. माडगूळकर यांच्या कवितांचे वाचन.

३. पुलंच्या साहित्यावर आधारित स्टॅण्डअप कॉमेडी शो / नाट्यस्पर्धा / प्रहसन स्पर्धा / प्रहसन सादरीकरणे.

४. **कुसुमाग्रज व इतर सुप्रसिद्ध थोर मराठी साहित्यिकांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन.**

५. **'मोबाईलवर मराठी'** - बोलू तसे टंकलेखन करणाऱ्या (स्पीच-टु-टेक्स्ट) मुक्त ॲपच्या माध्यमातून मोबाईलवर मराठीतून टंकलेखन करण्यास सुरुवात करा. तसेच, फक्त टंकलेखनासाठी उपयुक्त असणाऱ्या मुक्त ॲपच्या माध्यमातून मोबाईलवर मराठीतून टंकलेखन करा.

६. **'संगणकावर मराठी'** - संगणकावर युनिकोड-मराठी सुरु करा. महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील मुख्य पानावरील चलतचित्रानुसार आपल्या संगणकावर युनिकोड मराठी कार्यान्वित करण्याची कृती करा.

७. युनिकोडप्रणित मराठी आणि **इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक** संबंधित विषयांवरील प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन.

८. **मराठी भाषेसंबंधित** विषयांवर **व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे.** तज्ज्ञ, विचारवंत व साहित्यिकांच्या मुलाखती. तसेच साहित्यिक, भाषातज्ज्ञ, भाषा चळवळीतील कार्यकर्ते यांच्या सन्मान सोहळ्यांचे आयोजन.

९. न्यायव्यवहार, शासन-प्रशासन, प्रसारमाध्यमे, केंद्र तथा राज्य शासनाची कार्यालये, इतर अशासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी होणारा **मराठी भाषेचा वापर** याबाबत व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, सादरीकरणे यांचे आयोजन.

१०. **मातृभाषेची महती आणि माहिती,** तसेच मातृभाषेचे व्यक्तिगत व समाजजीवनातील स्थान आणि मातृभाषेचे मानसशास्त्रीय व शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने महत्त्व या विषयांवर **विचारमंथनात्मक कार्यक्रमांचे आयोजन.**

११. समाजप्रसार माध्यमांतील (सोशल मीडिया) मराठी, माहिती तंत्रज्ञान व मराठी, महाजालावरील (इंटरनेट) मराठी या क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने व सादरीकरणे.

१२. सन २०१८ — १९ हे वर्ष **राम गणेश गडकरी** यांचे **स्मृतिशताब्दी वर्ष** असल्याने, त्यांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करावे.

१३. मराठी वर्णमालेबाबत सादरीकरण किंवा व्याख्याने यांचे आयोजन.

१४. मराठीतील कोश वाङ्मयाबाबत माहितीपर व्याख्याने किंवा सादरीकरणे. तसेच, कोश कसे वाचावेत, याबाबत प्रशिक्षण.

१५. बोली भाषांवरील कार्यक्रमांचे आयोजन. (व्याख्याने, चर्चासत्रे, सादरीकरणे... इ.)

१६. शब्दभांडार आणि नवीन पर्यायी शब्दनिर्मिती यांबाबतच्या स्पर्धा.

१७. म्हणी, वाक्प्रचार, प्राचीन शब्द यांची व्युत्पत्ती – या विषयांवर रंजक व्याख्याने / सादरीकरणे.

१८. मराठी सुलेखन, सुंदर मराठी हस्ताक्षर स्पर्धा व संबंधित कार्यशाळांचे आयोजन.

१९. मराठी कविता, प्रसिद्ध उतारे, मराठीसंबंधित घोषवाक्ये यांचे भित्तीचित्र प्रदर्शन किंवा स्पर्धेचे आयोजन.

२०. मोडी लिपी चे प्रशिक्षण, व्याख्यान किंवा परिसंवादाचे आयोजन.

२१. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणाऱ्या अभ्यासक कार्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या संस्थांना किंवा प्रकल्पांना भेट देणे.

२२. इयत्ता १० वी व इ.१२ वी च्या परीक्षेत **मराठी विषयात सर्वाधिक गुण** मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार. तसेच मराठी विषयात पदवी आणि पदव्युत्तर पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या प्राध्यापकांच्या सत्काराचे आयोजन.

२३. **पुस्तकांचं गाव - भिलार** (ता. महाबळेश्वर, जि. सातारा) या महाराष्ट्र शासनाच्या अभिनव प्रकल्पाविषयी माहिती देणे, तसेच पुस्तकांच्या गावास भेट देणे.

---

टीप :

- आपण राबविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाच्या छायाचित्रांसह अहवाल unicode.vinodtawde@gmail.com या इ-पत्त्यावर किंवा पत्रात नमूद कार्यालयीन पत्त्यावर जरूर पाठवावा.
- अहवाल इ-पत्त्यावर पाठवताना युनिकोड प्रणित मराठी टंकांचा वापर अवश्य करावा.
- छायाचित्रे जोडताना ती निवडकच जोडावीत तसेच ती जेपीजी/जेपेगनी स्वरूपात फाईलस विद्यालय / महाविद्यालय / संस्था यांचे नाव देऊन पाठवावीत.